| MHK0170014722023 | **अंतिम हुकूमनामा क्र. ६/२०२३**<br>**सचिन शामराव पाटील**<br>**वि.**<br>**मारुती महादेव पाटील** |
| --- | --- |

## नि. १२ वरील आदेश

१. अर्जदाराने प्रस्तुत अर्ज या न्यायालयाने दिलेल्या नियमित दिवाणी मुकदमा २८/२०१९ मध्ये केलेल्या हुकूमनामेनुसार दावा मिळकत सिटीसर्वे क्रं. १२९२ चे पूर्ण क्षेत्र, १२९७ पैकी १/३ क्षेत्र, १२९८ पैकी १/४ क्षेत्र यामध्ये वादी यांचा असलेला हिस्सा कोर्ट कमीशनर यांचे मार्फत नेमणूक होवून सदर मिळकतींचे मोजमाप तसेच वाटप नकाशा तयार होणेकरिता दाखल केलेला आहे.

२. सदरच्या अर्जाची नोटीस बजावणी प्रतिवादी क्र. १ ते ७ यांना योग्य प्रकारे झालेली आहे तरी देखील सामनेवाला या कामी हजर झालेले नाहीत अगर त्यांनी सदरचे अर्जावर आपले म्हणणे देखील दिलेले नाही. त्यामुळे या अर्जावर सामनेवाला यांचे म्हणणे नाही असा आदेश पारीत करण्यात आला.

३. प्रस्तुत अर्ज, हुकूमनामा आणि त्यासोबत हजर करण्यात आलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. न्यायालयाने नियमित दिवाणी मुकदमा क्रमांक २८/२०२१ मध्ये घर जमिनीचे वाटप हे न्यायालयीन आयुक्त मार्फत करणेबाबतचा आदेश केलेला असल्यामुळे त्याचे वाटप सुचविण्यासाठी न्यायालयीन आयुक्ताची नेमणूक करणे या कामी योग्य व न्यायाचे होईल. तसेच प्रस्तुत आदेशाचे अवलोकन केले असता सदर दावा मिळकती वादी क्र. १ ते ३ यांचा प्रत्येकी १/९ हिस्सा असल्याचे दिसून येत आहे. अर्जदारांतर्फे वकील श्री. एस. एम. लुपणे यांनी कोणत्याही वकिलांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक करण्याची विनंती केली.

४. त्यामुळे पन्हाळा बारचे सदस्य वकील श्री. व्ही. ए. पाटील यांची घर जमीन मिळकतीचे प्रस्तावित सुचविण्यासाठी न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक करणे योग्य व संयुक्तिक होईल असे वाटते. त्यामुळे मी पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## **आदेश**

**१. वकील श्री. व्ही. ए. पाटील यांचे दाव्याचे परिच्छेद क्र.१–ब मधील वादी क्र. १ ते ३ व प्रतिवादी यांचा हिस्सा सुचविण्यासाठी न्यायालयीन आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.**

**२. अर्जदार यांनी न्यायालयीन आयुक्ताचे शुल्क रक्कम रु.५०००/– हे पुढील तारखेपर्यंत अगर तत्पूर्वी या न्यायालयात जमा करावयाचे आहे.**

**३. वकील श्री. व्ही. ए. पाटील यांना निर्देश देण्यात येत आहे की, न्यायालयीन आयुक्ताचे नेमून दिलेले काम न्यायालयीन आयुक्त शुल्क जमा झाल्याच्या तारखेपासून एक महिन्याचे आत पूर्ण करुन त्याचा सविस्तर अहवाल नकाशासहित न्यायालयासमोर हजर करावयाचा आहे.**

**४. वकील श्री. व्ही. ए. पाटील यांनी न्यायालयीन आयुक्ताचे काम करताना संबंधितांना पूर्व नोटीसी देऊन न्यायालयीन आयुक्ताचे काम करावयाचे आहे.**

**५. येणेप्रमाणे कमिशन पत्र पाठविण्यात यावे.**

**सही/–**

दि. ०२/०७/२०२५.

**( के. दि. काकतकर )**
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
पन्हाळा